सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०७ /२०१८-२०१९

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------

सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शुक्रवार दिनांक १६/११/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.१९/१०/२०१८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवठ्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महाराष्ट्र राज्याचे नागरी क्षेत्रातील झाडांचे संरक्षण व जतन करणेकरीता च नविन वृक्ष लागवड करुन नागरी क्षेत्रातील पर्यावरणाचा समतोल राखणेसाठी वृक्ष प्राधिकरण नियमातील कलम ३ (१) नुसार कमीत-कमी पाच व जास्तीत-जास्त १५ स्थानिक स्वराज्य संस्थेतील सदस्यांची नियुक्ती करण्याचे निर्देश केलेले आहेत. त्यानुसार मा.आयुक्तसो यांचे अध्यक्षतेखाली वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करणेस तसेच, सदस्यांची संख्या व नावाची यादी निश्चित होणेकामी **उपायुक्त (बांधकाम (उद्याने) विभाग) यांचे दि.०२/११/२०१८ चे विषयपत्र.**

५. मा.महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग,मुंबई यांचेकडील सन २०१८-१९ सालाची दरसूची महानगरपालिकेच्या विविध विकास कामाची अंदाजपत्रके तयार करणेसाठी महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात लागू करुन घेणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.११/१०/२०१८ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिका क्षेत्रातील विजयनगर सांगली मिरज रस्ता ते दक्षिणेकडे महापालिका हद्दीपर्यंत द.उ.२४.००मी.रुंदी ऐवजी १८.०० मी.रुंदी करणेबाबत व शासकीय जागेतून दर्शविलेल्या पुर्व+पश्चिम चालींच्या १२.०० मी.रुंदीच्या रस्त्याची आखणी रद्द करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेस प्रस्ताव मा.शासनाच्या मान्यतेस्तव सादर करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.२२/१०/२०१८ चे विषयपत्र.**

... २ ...

७. महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजना मधील खणभाग सि.स.नं.१/२८ब/१ या जागेवरील आ.क्र.२२० सी.पी.जी.या आरक्षणापैकी भागश: ८ फुट X ८० फुट क्षेत्र वगळणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेस व तसा प्रस्ताव मा.शासनाच्या मान्यतेस्तव सादर करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१२/१०/२०१८ चे विषयपत्र.**

८. महानगरपालिकेमार्फत मिरज हायस्कूल, मिरज ही मान्यता प्राप्त व अनुदानित माध्यमिक शाळा चालविली जाते. मिरज हायस्कूल मिरजच्या दैनंदिन कामकाजाकरीता व व्यवस्थापनाकरीता शालेय समिती गठण करणेस मान्यता मिळणेकामी **मुख्याध्यापक, मिरज हायस्कूल, मिरज यांचे दि.०५/०९/२०१८ चे पत्र.**

९. सांगली येथील स.नं.३६९/१,२ आरक्षण क्र.१३२ प्राथमिक शाळा आणि क्रिडांगण या आरक्षणाचा वापर बदलून नाट्यगृह असा वापर बदल करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेस व तसा प्रस्ताव मा.शासनाच्या मान्यतेस्तव सादर करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे विषयपत्र.**

१०. महापालिका क्षेत्रात केंद्र व राज्य शासनाच्या मार्फत सुरु असलेल्या प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकुल योजना, झोपडपट्टी पुर्नवसन या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी व त्यावर नियंत्रण ठेवणेसाठी महापालिकेची सनियंत्रण समिती स्थापन करणेस मान्यता देणेबाबत विचारार्थ व निर्णयार्थ सादर केलेले **उपायुक्त (नादानिक) यांचे विषयपत्र.**

११. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

१२. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौरसो यांचे मान्यतेने वितरीत

महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०७/२०१८-२०१९

महापालिका सभा दिनांक १६/११/२०१८ करीता.

शुक्रवार दि.१६/११/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.जगन्नाथ बापू ठोकळे व मा.ॲड.स्वाती नितीन शिंदे यांनी दिलेला प्रस्ताव:-

साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा सांगली शहरातील कर्मवीर भाऊराव पाटील या चौकामध्ये उभा करावा यासाठी विविध पक्ष/संघटनांचे पदाधिकारी सदनशीर मार्गाने आंदोलने करुन, शासनाचे लक्ष वेधीत आहेत. सद्या ज्या ठिकाणी साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा अर्धपुतळा उभा करणेत आलेला आहे. ती जागा सार्व.बांधकाम विभागाची असून, सदरची जागा पुर्णाकृती पुतळा तसेच, उद्यानासाठी त्वरीत उपलब्ध करुन द्यावी. तसेच, शासनाने पुतळा उभा करणेसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी सातत्याने अनेक पक्ष व संघटना यांच्याकडून वारंवार होत आहे. पक्ष व संघटना यांचे मागणीनुसार शासन निर्णय घेवून, पुतळा व सभोवतालची जागा उपलब्ध करुन देणेसाठी चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

२. मा.ॲड.स्वाती नितीन शिंदे यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिकेचा क्षेत्रातील दिव्यांगासाठी मा.शासनाच आदेशानुसार दिव्यांग सक्षमीकरणासाठी महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये तरतुद करणेबाबत आदेशीत करणेत आले आहे. त्यानुसार प्रशासनाने मनपा क्षेत्रातील तीनही शहरातील दिव्यांगांचे अर्ज स्विकारले होते. परंतु, या सर्व लाभार्थ्यांना याचा लाभ मिळालेला नाही. मनपाकडे आर्थिक तरतुद कमी असलेचे कारणावरुन या लाभार्थ्यांच्या बँक खातेवर पैसे जमा करता येत नसलेचे कारण प्रशासनाकडून देणेत येत आहे. तरी सदरच्या लाभार्थ्यांना उदरनिर्वाह भत्त्याचा लाभ मिळणेकामी प्रशासनाकडून निधी उपलब्ध करुन घेणेसाठी निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

३. मा.वर्षा अमर निंबाळकर व मा.अनारकली जमीर कुरणे यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१० मधील वडर कॉलनी येथील समाजमंदिर गेली ४५ ते ५० वर्षापूर्वी बांधणेत आलेल्या आहे ते अत्यंत जीर्ण व पडीक झालेले असून, त्या इमारतीचे बांधकाम अत्यंत धोकादायक झालेले असलेने, सदर समाजमंदिर वापराविना पडीक झालेले आहे. त्यामुळे सदरचे धोकादायक समाजमंदिर पाडून नविन वास्तु बांधणेकामी सन २०१८-१९ चेअर्थसंकल्पामधील ४१७६४ बाल हनुमान हौसिंग सोसायटी समाज मंदिर बांधणे या लेखाशिर्षावर र.रु.५० लक्ष मात्रची तरतुद करणेत आलेली आहे. तरी सदरचे समाज मंदिराचे जुने व जीर्ण व धोकादायक इमारत पाडणेकामी चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

४. मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.७ व वॉर्ड क्र.२० मधील हैदरखान विहिर झोपडपट्टी मिरज या अधिकृत झोपडपट्टीतील झोपडपट्टीधारकांना त्यांच्या मागणीनुसार माता रमाई घरकुल योजना तसेच प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ देणेत यावा. या परिसरातील झोपडपट्टी धारकांचे नजिक असणाऱ्या महानगरपालिकेच्या ओपन स्पेसमध्ये पुर्नवसन करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

५. मा. उत्तम बाळकृष्ण साखळकर, शेडजी सुबराव मोहिते व सौ. वर्षा अमर निंबाळकर यांनी दिलेला प्रस्ताव

अमृत अभियान योजना अंतर्गत मिरज नळपाणी योजना अंतर्गत ज्यादा दराचे निविदाधारक शशांक जाधव यांचा ठेका तात्काळ रद्द करणे व त्याठिकाणी फेर निविदा काढणेकामी चर्चा करुन निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

६. मा.हारुण अजिज शिकलगार यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली खणभाग व नळभाग येथील बदाम चौकाचे जे. पी. चौक असे नामकरण करणेबाबत निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

७. <u>मा. युवराज सतिश बावडेकर यांनी दिलेला प्रस्ताव :-</u>

महानगरपालिकेतील खाते प्रमुख, अभियंते, वरीष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक व शिपाई इ. कर्मचाऱ्यांना पदनिहाय विशिष्ठ रंगाचा गणवेश असणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत आलेला प्रस्ताव.

८. <u>मा. प्रकाश बाबासो ढंग यांनी दिलेला प्रस्ताव :-</u>

कुपवाड येथील रि.स.नं.४७०/४ येथील मनपा मालकीच्या ओपन स्पेसची खुली जागा जेष्ठ नागरीकांसाठी जेष्ठ नागरीक संघास दिर्घ मुदतीने देखभाल व दुरुस्तीसाठी स्नेहजीत प्रतिष्ठान संस्था यांना देणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

९. <u>मा. दिग्वीजय प्रदीप सुर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव :-</u>

मनपा क्षेत्रातील बायोमेडीकल कचरा उचलण्यासाठी सुर्या बायोमेडीकल वेस्ट कंपनीचा ठेका तात्काळ रद्द करुन त्यांना काळ्या यादीमध्ये समाविष्ठ करणेबाबत व फेर निविदा काढणेकामी चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : १४/११/२०१८.

महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १६/११/२०१८

ठराव क्रमांक :- ६९

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (बांधकाम (उद्यान) विभाग) यांचे दि.०२/११/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र राज्याचे नागरी क्षेत्रातील झाडांचे संरक्षण व जतन करणेकरीता व नविन वृक्ष लागवड करुन नागरी क्षेत्रातील पर्यावरणाचा समतोल राखणेसाठी महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे जतन व अधिनियम १९७५ हा सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस लागू आहे. वृक्ष प्राधिकरण अधिनियमातील कलम ३ (१) नुसार कमीत-कमी ०५ व जास्तीत जास्त १५ सदस्यांची नियुक्ती करणेचे निर्देश आहेत. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे माहे ऑगस्ट २०१८ पासून नविन नगर मंडळ अस्तित्वात आले असून, महानगरपालिका क्षेत्राकरिता वृक्ष प्राधिकरण समितीचे मा.आयुक्त हे पदसिद्ध अध्यक्ष असून, वृक्ष समिती गठीत करणेसाठी खालील सदस्यांची नावे निश्चित करुन वृक्षसमिती गठीत करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

१.	मा. आयुक्तसो	अध्यक्ष
२.	मा. राजेंद्र लक्ष्मण कुंभार	सदस्य
३.	मा.लक्ष्मण शिवराम नवलाई	सदस्य
४.	मा. आनंदा मारुती देवमाने	सदस्य
५.	मा.अस्मिता संदिप सलगर	सदस्य
६.	मा. रणजितसिंह संभाजी पाटील	सदस्य
७.	मा. सविता दादासो मदने	सदस्य
८.	मा. स्वाती नितीन शिंदे	सदस्य
९.	मा. सोनाली विलास सागरे	सदस्य
१०	मा. शुभांगी महेश साळुंखे	सदस्य
११.	मा. फिरोज हुसेन पठाण	सदस्य
१२.	मा.पद्मश्री प्रशांत पाटील	सदस्य
१३.	मा.दिग्विजीय प्रदिप सुर्यवंशी	सदस्य
१४.	मा.नर्गीस शमशुद्दीन सय्य्द	सदस्य
१५.	मा.मनशूकेरु सरगर	सदस्य

वरील प्रमाणे प्रशासनाने नोंद घेवून तसेच, समितीचे सचिव म्हणून बगीचा आवक्षेक यांनी काम पाहणेचे आहे असे ही सभा आदेशित करीत आहे.

शहर अभियंता (उद्याने)

सूचक :- मा. युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव
मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

अनुमोदक :- मा. लक्ष्मण नवलाई

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १६/११/२०१८

ठराव क्रमांक :- ७०

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१६/१०/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांची अंदाजपत्रके तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग,पूणे सन २०१८-१९ सालाची दरसूची दि.०१/०९/२०१८ पासून वापरणेस सार्वजनिक बांधकाम विभाग,पूणे यांनी मान्यता दिलेली आहे. डांबरीकरणाच्या कामासाठी वापरणेत येणाऱ्या डांबराच्या दरामध्ये गेल्या काही वर्षापासून दर पंधरा दिवसाला बदल होत आहे. त्यानुसार महापालिकेसही दर पंधरा दिवसाला भारत पेट्रोलियम यांचेकडून प्राप्त होणाऱ्या डांबराच्या बेसीक दराप्रमाणे अंदाजपत्रके तयार करणेस तसेच, बांधकाम विभागाकडील दरसूची व्यतिरिक्त म्हणजेच दरसूची मध्ये समाविष्ठ नसणारे आयटमही विकास कामांची अंदाजपत्रके तयार करताना आवश्यकतेनुसार वापरणे जरुरीचे असतात. तसेच, सद्यस्थिती मध्ये बाजारात सिमेंट व सळी इत्यादी बाबींच्या बेसीक दरामध्ये होणाऱ्या बदलानुसार व दरसूचीस अनुसरुन शासनाच्या सार्वजनिक विभागाकडून वेळोवेळी पारित होणाऱ्या आदेश व परिपत्रकानुसार सन २०१८-१९ ची दरसूचीस अनुसरुन महापालिका क्षेत्रातील विविध विकास कामांची अंदाजपत्रके तयार करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Y. S Bannuwar ठराव सर्वानुमते मंजुर

मा. युवराज बावडेकर

अनुमोदक :- मा. लक्ष्मण नवलाई महापौर,

शहर अभियंता.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर,
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १६/११/२०१८

ठराव क्रमांक :- ७१

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.२२/१०/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रातील विजयनगर सांगली मिरज रस्त्यांपासून मनपाच्या दक्षिण हद्दीपर्यत द.उ.रस्ता २४.०० मी.रुंदी ऐवजी १८.०० मी.रुंदी करणेबाबत व शासकीय जागेतून दर्शविलेल्या पूर्व पश्चिम चालीच्या १२.०० मी.रुंदीच्या रस्त्याची आखणी रद्द करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये एक महिन्याच्या मुदतीत सूचना हरकती मागवून व त्याप्रमाणे रस्त्याच्या फेरबदलाबाबत मा.शासनास प्रस्ताव सादर करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामीच्या सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर मा.महासभा ठराव क्र.१३४ दि.१९/०१/२०१८ अन्वये महानगरपालिका क्षेत्राची एकत्रित विकास योजना (भागश:) शासनाने दि.०४/०४/२०१२ रोजी मंजूर केलेली आहे. सदर विकास योजनेत सांगली मिरज रस्ता व पूर्व बाजूकडील २४ मी. रस्त्यालगत जिल्हा न्यायालयासाठी क्षेत्र आरक्षित आहे. जिल्हा न्यायालयीन इमारत पूर्व बाजूकडील विकास योजनेतील २४ मी. रस्त्याने अंशत: बाधीत होत असलेचे आढळून आले आहे. तसेच, न्यायालयाच्या ताब्यातील क्षेत्र पूर्व-पश्चिम चालीच्या १२ मी.रुंदीच्या रस्त्यामुळे विभागणी होत असलेचे दिसून येत आहे. यास्तव सांगली मिरज मुख्य रस्त्यापासून दक्षिणेकडे महापालिका हद्दीपर्यत असणारा २४ मी.रुंदीचा रस्ता हा १८ मी.रुंदीने कायम ठेवणे योग्य होईल. मात्र, तो ठेवत असताना विद्यमान बांधकामे कमीत-कमी बाधीत होतील अशा पद्धतीने व सद्या अस्तित्वातील रस्त्याचा मध्यापासून दोन्ही बाजूस प्रत्येकी ९मी. याप्रमाणे नियोजित २४ मी. रस्ता रुंदी ऐवजी १८ मी.रुंदीने रस्ता करणेस तसेच, शासकीय जागेतून दर्शविलेल्या पुर्व पश्चिम चालीच्या १२ मी. रस्त्याची आखणी रद्द करणे आवश्यक असल्याने, सदर १२ मी.रस्त्याची आखणी रद्द करणेस तसेच, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये सदर दोन्ही फेरबदलासाठीचा आवश्यक तो प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करणेस व त्या अनुषंगिक कार्यवाही करणेस मान्यता देणेत आलेली होती.

त्यानुसार मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने दैनिक वृत्तपत्रामध्ये व महाराष्ट शासनाच्या राज्यपत्रामध्ये प्रसिद्ध करुन त्यावर सूचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत कोणतीही सूचना व हरकत प्राप्त झाल्या नसल्याने व जरुरती वैधानिक कार्यवाही पूर्ण केली असल्याने, महापालिका क्षेत्रातील विजयनगर सांगली मिरज रस्त्यापासून मनपाच्या दक्षिण हद्दीपर्यत द.उ.रस्ता २४.००मी.रुंदी ऐवजी १८.००मी.रुंदीने कमीत-कमी बांधकामे बाधित होतील अशा पद्धतीने रुंदी कमी करणेबाबत व शासकीय जागेतून दर्शविलेल्या पूर्व पश्चिम चालीच्या १२.०० मी.रुंदीच्या रस्त्याची आखणी रद्द करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेस व तसा प्रस्ताव मा.शासन मान्यतेस्तव सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

प्र.संघाटक (न.र.)

सूचक :- Y. S. Bannuwar
मा. युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-
मा. विनायक सिंहासने

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १६/११/२०१८

ठराव क्रमांक :- ७२

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१२/१०/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली खणभाग सि.स.नं.१/२८/ब/१ मनपा मंजूर विकास योजनेमधील आरक्षण क्र.२२० सी.पी.जी. अंदाजे क्षेत्र ५०० चौ.मी. पैकी ६३ चौ.मी. (अंशत:) बाधीत होणाऱ्या जागेवरील आरक्षण वगळणेस अर्जदार सौ.गानू यांनी निवेदन दिले असून, सन २०१० मध्ये मा.शासनास विनंती अर्ज सादर केलेला होता. त्यावर सन २०११ मध्ये महापालिकेने मा.संचालक,नगररचना महाराष्ट्र राज्य यांचे अभिप्राय शासनाने मागविलेले होते. त्यामध्ये आरक्षण क्र.२२० मध्ये अर्जदाराचा संडास,बाथरुम व पाण्याचा हौद बाधीत होत असलेने व घरास पुरेसा पोहोच रस्ता उपलब्ध नसलेने अर्जदाराची विनंती योग्य असल्याने त्यांच्या विनंतीनुसार सी.पी.जी.आरक्षण अंशत: वगळण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यास हरकत नाही असे मा.संचालक नगररचना यांना महापालिकेमार्फत कळविणेत आलेले आहे.

महानगरपालिकेने शासनास सादर केलेल्या प्रारुप विकास योजनेत सदर आरक्षण कायम होते. शासनाने भागश: मंजूरी देतेवेळी ते कायम झालेले आहे. तद्वत यापूर्वी महापालिकेने या प्रकरणी सादर केलेला अहवाल विचारात घेता अर्जदार यांची विनंती योग्य असलेने, सदर आरक्षण अशंत: (८ फुट x ८० फुट) वगळणेबाबत / हद्द दुरुस्तीबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील कलम ३७(१) अन्वये कार्यवाही करणेस व तसा प्रस्ताव मा.शासनाच्या मान्यतेस्तव सादर करणेस मा.महासभा ठराव क्र.१७३ दि.२०/०२/२०१८ अन्वये मान्यता देणेत आली होती. त्यानुसार दैनिक वृत्तपत्रामध्ये व महाराष्ट्र राज्यपत्र पुणे याद्वारे प्रसिद्ध करुन त्यावर सुचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत कोणतीही सूचना व हरकत प्राप्त झाल्या नसल्याने, महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजना मधील खणभाग सि.स.नं.१/२८ब/१ या जागेवरील आ.क्र.२२० सी.पी.जी.या आरक्षणापैकी भागश: ८ फुट X ८० फुट क्षेत्र वगळणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

स्वा.संभाजी (न.२)

सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचक :- Y. S. Bannur
(मा.युवराज बन्नोकर)

ठराव सर्वानुमते मंजुर
महापौर,

अनुमोदक :-
(मा.संजय मगदूम)

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १६/११/२०१८

ठराव क्रमांक :- ७३

विषय क्रमांक :- ०८

- सोबतचे मुख्याध्यापक,मिरज हायस्कूल, मिरज यांचे दि.०५/०९/२०१८ रोजीचे पत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने मिरज हायस्कूल,मिरज ही मान्यता प्राप्त व अनुदानीत माध्यमिक शाळा चालविली जाते. सदर शाळेचे कामकाज महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी,सेवाशर्ती नियमावली-१९८१ मधील तरतुदी अन्वये चालविले जाते. शालेय व्यवस्थापनाकरिता महानगरपालिकेमार्फत शालेय समिती गठीत केली जाते. मा.महापौर हे या शालेय व्यवस्थापन समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतात किंवा कोणाही व्यवस्थापन मंडळातील सदस्यास ते अध्यक्ष म्हणून नियुक्त करु शकतात अशी सदर नियमात तरतुद आहे.

यापुर्वी महासभा ठराव क्र.५९ दि.२०/०८/२०१४ अन्वये शालेय समितीचे गठण केले होते. सदर व्यवस्थापनाची मुदत संपलेने व व्यवस्थापनाच्या मुदतीबरोबरच शालेय समितीची मुदत संपत असलेने, मिरज हायस्कूलच्या दैनंदिन कामकाजाकरीता यापूर्वी गठीत करणेत आलेली शालेय समिती रद्द करुन, शालेय समितीचे पुर्नगठण करणे या सभेस उचित वाटते. महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी,सेवाशर्ती नियमावली १९८१ मधील अनुसूची "अ" (नियम २ (१)(इ)) २(क) मधील तरतुदीनुसार "आणखी असे की, नियामक मंडळाच्या अध्यक्षाला त्यांने नामनियुक्त केलेली व्यक्ती एक वर्षानंतर बदलण्याचा हक्क राहील, त्याचप्रमाणे नियामक मंडळाला त्याने नामनियुक्त केलेल्या व्यक्तीपैकी एक किंवा जास्त व्यक्ती एक वर्षानंतर बदलण्याचा हक्क राहील."

त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे नुतन महापौर यांची निवड करणेत आलेली असलेने, मिरज हायस्कुल मिरजच्या दैनंदिन कामकाजाकरीता व व्यवस्थापनाकरीता खालील प्रमाणे शालेय समितीचे गठण करणेस ही सभा मान्यता देत आहे.

१. मा.संगिता विठ्ठलराव खोत,महापौर	:-	पदसिद्ध अध्यक्ष
२. मा.आनंदा मारुती देवमाने	:-	सदस्य
३. मा. शिवाजी बाबूराव दुर्वे	:-	सदस्य
४. मा.निरंजन सुरेश आवटी	:-	सदस्य
५. मा.मुख्याध्यापक, मिरज हायस्कूल	:-	पदसिद्ध सचिव
६. कायम शिक्षकापैकी जेष्ठता क्रमानुसार सेवाजेष्ठ शिक्षक	:-	सदस्य
७. शिक्षिकेत्तर कर्मचाऱ्यापैकी जेष्ठता क्रमानुसार एक कर्मचारी	:-	सदस्य

वरील प्रमाणे मिरज हायस्कूल साठी शालेय समिती अस्तित्वात आल्याचे ही सभा जाहीर करीत असून, व्यवस्थापन मंडळाची मुदत संपेपर्यत ही समिती अस्तित्वात राहील असे ही सभा ठरवित आहे.

मुख्याध्यापक
मिरज हायस्कूल

सूचक :- मा. प्रकाश ढंग

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :- मा. धीरज सुर्यवंशी.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १६/११/२०१८

ठराव क्रमांक :- ७४

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०५/११/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली येथील स.नं.३६९/१,२ आरक्षण क्र.१३२ प्राथमिक शाळा आणि क्रिडांगण या आरक्षणाचा वापर बदलून नाट्यगृह असा वापर बदल करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेस व तसा प्रस्ताव मा.शासनाच्या मान्यतेस्तव सादर करणेस मान्यता मिळणेकामी विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला आहे. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा होवून, चर्चेअंती प्रस्तुतचा प्रस्ताव ही सभा रद्द करीत असून, प्रस्तावित कामी सुधारीत प्रस्ताव आगामी सभेसमोर सविस्तर तपशिलवार सादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा. युवराज बावडेकर — ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. रहेमान नवलाई — महापौर,

सहा. संचालक (नगररचना)

महापालिका सचिव
मिरज आणि कुपवाड शहर,
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १६/११/२०१८

ठराव क्रमांक :- ७५

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (नादानिक) यांचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रात केंद्र व राज्य शासनाच्या मार्फत सुरु असलेल्या प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकुल योजना, झोपडपट्टी पुर्नवसन व सर्वांसाठी घरे सन २०२२ या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी व त्यावर नियंत्रण ठेवणेसाठी तसेच, झोपडपट्टींचे पुर्नवसन तात्काळ होणेसाठी खालीलप्रमाणे सदस्य निश्चित करुन, महापालिकेची सनियंत्रण समिती स्थापन करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

१. मा.जगन्नाथ बापू ठोकळे	:- अध्यक्ष
२. मा.संगिता विठ्ठलराव खोत, महापौर	:- सदस्य
३. मा.धीरज चंद्रकांत सुर्यवंशी,उपमहापौर	:- सदस्य
४. मा.युवराज सतिश बावडेकर,सभागृहनेता	:- सदस्य
५. मा.आनंदा मारुती देवमाने	:- सदस्य
६. मा. महेंद्र रमाकांत सावंत	:- सदस्य
७. मा.सुबराव नागाप्पा मद्रासी	:- सदस्य
८. मा.गजानन रामू मगदूम	:- सदस्य
९. मा.अनिता मोहन व्हनकंडे	:- सदस्य
१०. मा.सोनाली विलास सागरे	:- सदस्य
११. मा.संजय नारायण यमगर	:- सदस्य
१२. मा.अप्सरा महेंद्र वायदंडे	:- सदस्य
१३. मा.सुनंता चंद्रकांत राऊत	:- सदस्य
१४. मा.प्रकाश शामराव मुळके	:- सदस्य
१५. मा.करण किशोर जामदार	:- सदस्य
१६. मा.कांचन युवराज कांबळे	:- सदस्य
१७. मा.विष्णू आण्णासाहेब माने	:- सदस्य
१८. मा.अतहर इद्रिस नायकवडी	:- सदस्य
१९. मा.मालन चंद्रकांत हुलवान	:- सदस्य
२०. मा.विजय वसंत घाडगे	:- सदस्य

सूचक :- (मा.युवराज बावडेकर)

अनुमोदक :- (मा.संगिता खोत)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

नागरसचिव (नादानिक)

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर,
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- १६/११/२०१८

ठराव क्रमांक :- ७६

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये खालील सदस्यांनी दिलेले प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

अ.क्र.	प्रस्ताव देणाऱ्या सदस्यांचे नाव	तपशिल
१.	जगन्नाथ बापू ठोकळे व ॲड.स्वाती नितीन शिंदे	साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा सांगली शहरातील कर्मवीर भाऊराव पाटील या चौकामध्ये उभा करावा यासाठी विविध पक्ष/संघटनांचे पदाधिकारी सदनशीर मार्गाने आंदोलने करुन, शासनाचे लक्ष वेधीत आहेत. सद्या ज्या ठिकाणी साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा अर्धपुतळा उभा करणेत आलेला आहे. ती जागा सार्व.बांधकाम विभागाची असून, सदरची जागा पुर्णाकृती पुतळा तसेच, उद्यानासाठी त्वरीत उपलब्ध करुन द्यावी. तसेच, शासनाने पुतळा उभा करणेसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी सातत्याने अनेक पक्ष व संघटना यांच्याकडून वारंवार होत आहे. पक्ष व संघटना यांचे मागणीनुसार शासन निर्णय घेवून, पुतळा व सभोवतालची जागा उपलब्ध करुन देणेसाठी चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.
२.	ॲड.स्वाती नितीन शिंदे	महानगरपालिकेचा क्षेत्रातील दिव्यांगासाठी मा.शासनाचे आदेशानुसार दिव्यांग सक्षमीकरणासाठी महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये तरतुद करणेबाबत आदेशीत करणेत आले आहे. त्यानुसार प्रशासनाने मनपा क्षेत्रातील तीनही शहरातील दिव्यांगांचे अर्ज स्विकारले होते. परंतु, या सर्व लाभार्थ्यांना याचा लाभ मिळालेला नाही. मनपाकडे आर्थिक तरतुद कमी असलेचे कारणावरुन या लाभार्थ्यांच्या बँक खातेवर पैसे जमा करता येत नसलेचे कारण प्रशासनाकडून देणेत येत आहे. तरी सदरच्या लाभार्थ्यांना उदरनिर्वाह भत्त्याचा लाभ मिळणेकामी प्रशासनाकडून निधी उपलब्ध करुन घेणेसाठी निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.
३.	वर्षा अमर निंबाळकर व अनारकली जमीर कुरणे	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१० मधील वडर कॉलनी येथील समाजमंदिर गेली ४५ ते ५० वर्षापूर्वी बांधणेत आलेल्या आहे ते अत्यंत जीर्ण व पडीक झालेले असून, त्या इमारतीचे बांधकाम अत्यंत धोकादायक झालेले असलेने, सदर समाजमंदिर वापराविना पडीक झालेले आहे. त्यामुळे सदरचे धोकादायक समाजमंदिर पाडून नविन वास्तु बांधणेकामी सन २०१८-१९ चेअर्थसंकल्पामधील ४१७६४ बाल हनुमान हौसिंग सोसायटी समाज मंदिर बांधणे या लेखाशिर्षावर र.रु.५० लक्ष मात्रची तरतुद करणेत आलेली आहे. तरी सदरचे समाज मंदिराचे जुने व जीर्ण व धोकादायक इमारत पाडणेकामी चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

... २ ...

४.	[illegible] बापू ठोकळे	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.७ व वॉर्ड क्र.२० मधील हैदरखान विहिर झोपडपट्टी मिरज या अधिकृत झोपडपट्टीतील झोपडपट्टीधारकांना त्यांच्या मागणीनुसार माता रमाई घरकुल योजना तसेच प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ देणेत यावा. या परिसरातील झोपडपट्टी धारकांचे नजिक असणाऱ्या महानगरपालिकेच्या ओपन स्पेसमध्ये पुर्नवसन करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.
५.	उत्तम बाळकृष्ण साखळकर, शेडजी सुबराव मोहिते व सौ. वर्षा अमर निंबाळकर	अमृत अभियान योजना अंतर्गत मिरज नळपाणी योजना अंतर्गत ज्यादा दराचे निविदाधारक शशांक जाधव यांचा ठेका तात्काळ रद्द करणे व त्याठिकाणी फेर निविदा काढणेकामी चर्चा करुन निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.
६.	हारुण अजिज शिकलगार	सांगली खणभाग व नळभाग येथील बदाम चौकाचे जे. पी. चौक असे नामकरण करणेबाबत निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.
७.	युवराज सतिश बावडेकर	महानगरपालिकेतील खाते प्रमुख, अभियंते, वरीष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक व शिपाई इ. कर्मचाऱ्यांना पदनिहाय विशिष्ठ रंगाचा गणवेश असणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत आलेला प्रस्ताव.
८.	प्रकाश बाबासो ढंग	कुपवाड येथील रि.स.नं.४७०/४ येथील मनपा मालकीच्या ओपन स्पेसची खुली जागा जेष्ठ नागरीकांसाठी जेष्ठ नागरीक संघास दिर्घ मुदतीने देखभाल व दुरुस्तीसाठी स्नेहजीत प्रतिष्ठान संस्था यांना देणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव
९.	दिग्वीजय प्रदीप सुर्यवंशी	मनपा क्षेत्रातील बायोमेडीकल कचरा उचलण्यासाठी सुर्या बायोमेडीकल वेस्ट कंपनीचा ठेका तात्काळ रद्द करुन त्यांना काळ्या यादीमध्ये समाविष्ठ करणेबाबत व फेर निविदा काढणेकामी चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

उपरोक्त सर्व प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर केलेनंतर निर्णय घेणे उचित होईल असे या सभेचे मत असून, उपरोक्त सर्व प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावेत असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- Y. S Bawadekar
(मा. युवराज बावडेकर)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [signature]
(मा. पांडुरंग कोरे)

महापौर,

१) शहर अभियंता, (२) नगर अभियंता (दिव्यांग कक्ष), (३) अतिक्रमण निर्मुलन प्रमुख,
४) नगर अभियंता (नाटानिका), (५) पाणीपुरवठा अभियंता, (६) मालमत्ता व्यवस्थापक,
७) प्रशासकीय अधिकारी, (८) आरोग्याधिकारी,

आपले विभागांशी संबंधित विषयाचे सविस्तर अहवाल आगामी सभेसमोर सादर करणेत यावेत.

[signature]
महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर,
महानगरपालिका.